महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.८९१/एसएम- २
नादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २७ डिसेंबर, २०१७

प्रस्तावना -

पोदार चॅरिटी ट्रस्ट, मुंबई संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल, सर्व्हे नं.८६, रोहकाल, चाकण खेड रोड, जि. पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत पोदार चॅरिटी ट्रस्ट, मुंबई संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल, सर्व्हे नं.८६, रोहकाल, चाकण खेड रोड, जि. पुणे ही नवीन शाळा (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इयत्ता १ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्य मंडळ) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहायित तत्वावर सुरू करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(२) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवरथापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवरथापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन

निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(३) परवानगी देण्यात आलेल्या शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(४) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(६) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(७) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(स्वा.म.नानल)<br>
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प. पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता दिलेल्या परवानगीबाबत

पोदार एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई संचलित ३ व पोदार चॅरिटी ट्रस्ट, मुंबई संचलित २ शाळांच्या नावामध्ये "पोदार इंटरनॅशल स्कूल" ऐवजी "पोदार ब्लॉसम स्कूल" असा बदल करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुद्धीपत्रक क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र.१५१७/एसएम-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक: २४ डिसेंबर, २०१८

वाचा :-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१७/प्र.क्र.८८९/एसएम-२, दिनांक २७ डिसेंबर, २०१७.
२. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१७/प्र.क्र.८९२/एसएम-२, दिनांक २७ डिसेंबर, २०१७.
३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१८/प्र.क्र.२१४/एसएम-२, दिनांक ०७ मार्च, २०१८.
४. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१७/प्र.क्र.८५९/एसएम-२, दिनांक २७ डिसेंबर, २०१७.
५. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१७/प्र.क्र.८९१/एसएम-२, दिनांक २७ डिसेंबर, २०१७.

शासन शुद्धीपत्र:-

पोदार एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई संचलित ३ शाळांना ( (१) पोदार इंटरनॅशल स्कूल, सर्व्हे नं.१६९५, १६९९ व १७००, कराड मसूर रोड, कोपर्डे हवेली व्हिलेज, कराड, जि.सातारा २) पोदार इंटरनॅशल स्कूल, श्री.गणेश नगरी, मौजा भोकरा, कोराडी रोड, नागपूर व ३) पोदार इंटरनॅशल स्कूल, सर्व्हे नं.१६/४, करधा, ता.जि.भंडारा) व पोदार चॅरिटी ट्रस्ट, मुंबई संचलित २ शाळांना ( (१) पोदार इंटरनॅशल स्कूल, सर्व्हे नं.४६१/१, अंबेजोगाई, लातूर रोड, अंबेजोगाई, जि.लातूर व २) पोदार इंटरनॅशल स्कूल, सर्व्हे नं.८६, रोहकाल, चाकण खेड रोड, जि.पुणे ) अशा ५ शाळांना उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामधील शाळांच्या नावामध्ये "पोदार इंटरनॅशल स्कूल" ऐवजी "पोदार ब्लॉसम स्कूल" अशी दुरूस्ती करण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

२. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा /दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतच्या संदर्भाधीन दिनांक ०७ मार्च, २०१८ व २७ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसाच्या आत कळविण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.वि.कुडले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर / औरंगाबाद / पुणे / कोल्हापूर.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर / बीड / पुणे / सातारा / भंडारा.
७. निवडनस्ती (एसएम-२)



Scanned by CamScanner